# राष्ट्रीय सेवा योजना

श्री. स.ह.केळकर वरिष्ठ महाविद्यालय, देवगड
आणि
श्रीमती न.शा.पंतवालावलकर कनिष्ठ महाविद्यालय, देवगड

# मीठमुंबरी येथील एन.एस.एस. निवासी शिबिरादरम्यान केलेल्या सर्वेक्षणाचे विश्लेषण

(२०१७-२०१८)

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी आणि स्वयंसेवक

ऋणनिर्देश

सर्व प्रथम शिक्षण विकास मंडळाचे आभार. संस्थेने याठिकाणी काम करण्याची संधी दिली. मा. सभापती, श्री.अमित जामसंडेकर आणि इतर सन्माननीय संस्थेचे पदाधिकारी यांनी आम्हाला वेळोवेळी प्रोत्साहन दिले. महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. जी. टी. परुळेकर यांचे आभार. सरांनी नेहमीच आमच्या पाठीशी राहून काम करण्याची उर्जा दिली. भगीरथ प्रतिष्ठान, झारापचे डॉ. प्रसाद देवधर यांचे आभार ज्यांनी आम्हाला प्रश्नावलीच्या अनुषंगाने मार्गदर्शन केले. प्रा. तेउरवाडकर बाळकृष्ण आणि त्यांचे BMS चे विद्यार्थी ज्यांचे आभार ज्यांनी महितीचे विश्लेषण करण्यास मदत केली. मा. गावकर बाळकृष्ण, सरपंच, मिठ्मुंबरी यांनी ग्रामस्थांना वेळोवेळी सांगून प्रश्नावालीला सकारात्मक प्रतिसाद देण्याचे सांगितले. त्यांचे आभार. राजेंद्र मुंबरकर, गणपत गावकर, तांबे सर, हेमंत तोडणकर, आणि इतर ग्रामस्थ यांचे आभार ज्यांनी आम्हाला वेळोवेळी सहकार्य केले. आणि ज्यांनी ज्यांनी या कमी सहकार्य केले त्यांना त्या ज्ञात अज्ञातांना धन्यवाद!

1) कार्यक्रम अधिकारी, कनिष्ठ विभाग

2) कार्यक्रम अधिकारी, वरिष्ठ विभाग

3) सहाय्यक कार्यक्रम अधिकारी

4) स्वयंसेवक

# मीठमुंबरी येथील एन.एस.एस. निवासी शिबिरादरम्यान केलेल्या सर्वेक्षणाचे विश्लेषण

## प्रस्तावना

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून घोषित झाल्यापासून पर्यटकांच्या केंद्रस्थानी हा जिल्हा आलेला आहे. विस्तीर्ण किनारपट्टी लाभलेला हा परिसर पर्यटकांचे आकर्षण बनून राहिलेला आहे. पण या जिल्ह्यातील देवगड तालुका पर्यटनाच्या दृष्टीने थोडासा दुर्लक्षित असाच

म्हणावा लागेल. शेजारीच असलेला मालवण हा तालुका पर्यटनाच्या दृष्टीने केंद्रबिंदू असताना देवगड कसा दुर्लक्षित असा प्रश्न देवगडवासीयांना पडतो. आणि याहून कोडे म्हणजे चार किलोमीटरची समृद्ध सागरी किनारपट्टी लाभलेला मीठमुंबरीचा परिसर पर्यटनाच्या कोणत्याही नकाश्यावर नाही. पण देवगड - कुणकेश्वर मार्गावर तारामुंबारीच्या खाडीवर पूल झाला आणि एरव्ही कोणाचेही लक्ष्य नसलेले हे ठिकाण पर्यटनाच्या केंद्रस्थानी आले.

देवगडचे शिक्षण विकास मंडळ आणि या संस्थेचे देवगड महाविद्यालय नेहमीच देवगड तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी अग्रेसर राहिले आहे. मीठमुंबरीचा पर्यटन विकास कोणीही रोखू शकत नाही. पण तो विकास येथील भूमिपुत्रांना सोबत घेऊन व्हावा या उद्देशाने मीठमुंबरी या गावावर लक्ष्य केंद्रित करावयाचे असे संस्थेने ठरविले. देवगड महाविद्यालयातील कनिष्ठ आणि वरिष्ठ विभागातील एन.एस.एस.च्या स्वयंसेवकांच्या साथीने काम करून या ठिकाणी शाश्वत पर्यटन विकास कसा साधता येईल याचे विचार मंथन झाले.

प्रथम मीठमुंबरीची एकंदर स्थिती जाणून घेण्यासाठी एक प्रश्नावली बनविली. यासाठी भगीरथ प्रतिष्टान, झारापचे डॉ. प्रसाद देवधर यांची मदत घेतली. रूपरेखा ठरली. काही बैठका झाल्या. पहिल्या बैठकीमध्ये मा. प्राचार्य यांनी मीठमुंबरी या गावी शाश्वत पर्यटन विकास कामासाठी महाविद्यालयाचा एन.एस.एस. विभाग पाच वर्षे काम करेल हे जाहीर केले. एका ग्रामसभेत प्रश्नावलीचे वाचन करण्यात आले आणि नंतर २३/१२/२०१७ ते २९/१२/२०१७ या कालावधीत कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या एन.एस.एस. च्या निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

'शाश्वत पर्यटन विकास' ही संकल्पना घेऊन कनिष्ठ व वरिष्ठ विभाग एन.एस.एस.चे १०० स्वयंसेवक मीठमुंबरीला शिबीर स्थळी दाखल झाले. शिबिरादरम्यान श्रमसंस्कार, विविध व्याख्याने, परिसंवाद, इत्यादी कार्यक्रमांबरोबरच एन.एस.एस. स्वंयसेवकांनी प्रश्नावली हातात घेऊन प्रत्येक कुटुंबात जाऊन सर्वेक्षणाचे काम केले. या प्रश्नावलीचे विश्लेषण येथे मांडण्याचा प्रयत्न करीत आहोत.

## <u>उद्दिष्टे</u>

1) मीठमुंबरी गावचे कौटुंबिक सर्वेक्षण करणे.
2) मीठमुंबरी ग्रामस्थांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.
3) या ठिकाणी पर्यटन विषयक विविध उद्योगांच्या शक्यता अजमावणे.
4) येथील ग्रामस्थांची पर्यटन विकास विषयक मानासिकता अभ्यासणे.
5) ग्रामस्थांची पर्यटन विकासासाठी कर्ज घेण्याची तयारी आहे का ते अजमावणे.

## व्याप्ती आणि मर्यादा

मीठमुंबरी या गावचे भौगोलिक क्षेत्रफळ २२०-२८-१२ इतके असून भातशेती ५०-१०-० इतकी आहे तर बागायत क्षेत्र ८०-०६-९ इतके आहे. ह्या गावात सहा वाड्या आहेत- बागवाडी, खालचीवाडी, बौद्ध वाडी, आडवाडी, साकर्डेवाडी आणि मधली वाडी. गावची लोकसंख्या १०११ इतकी असून बी.पी.एल. कुटुंबे १११ इतकी इतकी तर मागास वर्गीय कुटुंबे ३४ इतकी आहेत. या प्रकल्प कार्याची व्याप्ती आणि मर्यादा यांचा विचार करता मीठमुंबरी या गावापुरते हे सर्वेक्षण मर्यादित आहे.

## प्रकल्प पद्धती आणि कार्यपद्धती


मीठमुंबरी या गावचे सर्वेक्षण करायचे असल्याने सर्वेक्षण पद्धतीचा वापर या ठिकाणी करण्यात आलेला आहे. प्रश्नावली ही close स्वरुपाची होती. तिचा आधार घेऊन मीठमुंबरीतील कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आलेले आहे. एन.एस.एस.चे स्वंयसेवकांकडून या गावातील प्रत्येक वाडीतून म्हणजे - बागवाडी, खालचीवाडी, बौद्ध वाडी, आडवाडी, साकर्डेवाडी आणि मधली वाडी अश्या सहा वाड्या मधील प्रत्येक कुटुंबात जाऊन सर्वेक्षण करण्यात आले. गावातून एकूण २०२ प्रश्नावल्या भरण्यात आल्या. तर ५१ घरे बंद स्थितीत आढळली. या सर्वेक्षणासाठी कनिष्ठ व वरिष्ठ एन.एस.एस. स्वयंसेवकांचे विविध गट तयार करून सुमारे ८६ स्वयंसेवक यांच्या सहाय्याने सदर सर्वेक्षण करण्यात आले.

सदर सर्वेक्षण पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयातील BMS च्या विद्यार्थ्यांचे सहाय्य घेण्यात आले. प्रा. बाळकृष्ण तेउरवाडकर यांचे मार्गदर्शनाखाली 40 विद्यार्थ्यांकडून सदर प्रश्नावलीचे विश्लेषण करण्यात आले. हे विश्लेषण करण्यासाठी प्रत्येक प्रश्नानुसार तक्ते तयार करण्यात येऊन २०२ प्रश्नावलींची वारंवारता नोंदवून घेण्यात येऊन त्याची टक्केवारी काढण्यात आली. सदर माहिती table आणि काही pie-chart च्या स्वरुपात मांडण्यात येऊन या माहितीचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

## माहितीचे विश्लेषण

1) घराचा प्रकार

| अ.क्र. | बांधकाम प्रकार | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | कच्चे | ४८ | 23.76% |
| 2 | पक्के | १५४ | 76.23% |





विश्लेषण

मिठ्मुंबरीतील घरांपैकी 76 टक्के घरे पक्की आहेत तर २४ टक्के घरे ही कच्ची आहेत असे आढळले

2) घराचे स्वरूप

| अ.क्र. | घराचे स्वरूप | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | एक माजली | १८७ | 92.57% |
| 2 | दोन मजली | १५ | 7.42% |
| 3 | तीन मजली | 0 | 0% |
| 4 | चार मजली | 0 | 0% |





विश्लेषण

मिठ्मुंबारीतील घरांपैकी 92.57 टक्के घरे एक मजली आहेत तर केवळ 7.42 टक्के घरे दोन मजली आहेत. तीन किंवा चार मजली इमारत येथे नाहीत.

3) वास्तव्याचे स्वरूप

| अ.क्र. | वास्तव्याचे स्वरूप | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | कायमस्वरूपी | १८० | 89.11% |
| 2 | अल्पकलावधीसाठी | १० | 4.95% |
| 3 | समारंभासाठी | 7 | 3.47% |
| 4 | सणसमारंभासाठी | 5 | 2.47% |
| 5 | इतर | 3 | 0.99% |





विश्लेषण

मिठ्मुंबारीतील ग्रामस्थांपैकी 88 टक्के ग्रामस्थ खुद्द गावात राहतात तर केवळ 12 टक्के ग्रामस्थ कामधंद्यासाठी इतरत्र राहून अल्पकालावधीसाठी किंवा सण समारंभासाठी गावी येतात.

4) कायमस्वरूपी वास्तव्यास नसल्यास आपले घर व्यावसायिक कारणासाठी भाडे तत्वावर देण्याची तयारी

| अ.क्र. | तयारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | २७ | 13.37% |
| 2 | नाही | १७५ | 86.63% |




विश्लेषण

मिठ्मुंबारीतील ग्रामस्थांपैकी 86.63 टक्के ग्रामस्थांची आपले घर व्यवसायासाठी भाडे तत्वावर देण्याची तयारी नाही. केवळ 13.37 टक्के ग्रामस्थ अशी तयारी दाखवितात.

( इथून पुढे केवळ  table मांडून विश्लेषण करण्यात आले आहे. )

5) कायमस्वरूपी वास्तव्यास असल्यास आपली घरचा भाग/खोल्या  व्यावसायिक कारणासाठी भाडे तत्वावर देण्याची तयारी

| अ.क्र. | तयारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ५७ | 28.22% |
| 2 | नाही | १४५ | 71.78% |

विश्लेषण

कायमस्वरूपी वास्तव्यास असल्यास आपली घरचा भाग/खोल्या  व्यावसायिक कारणासाठी भाडे तत्वावर देण्याची तयारी आहे काय असा प्रश्न विचारल्यानंतर 71.78 टक्के ग्रामस्थांनी नाही असे उत्तर दिले. तर 28.22 टक्के ग्रामस्थ व्यावसायिक कारणासाठी आपले घर द्यायला तयार आहेत.

6) पर्यटनाशी संबधित व्यवसाय सुरु करण्याची तयारी

| अ.क्र. | तयारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | १०६ | 52.48% |
| 2 | नाही | ९६ | 47.52% |

विश्लेषण

पर्यटनाशी संबधित व्यवसाय सुरु करण्याची तयारी आहे काय असा प्रश्न विचारल्यानंतर 52.48 टक्के ग्रामस्थांनी 'आहे'  असे उत्तर दिले. म्हणजेच एवढ्या ग्रामस्थांची व्यवसाय करायची तयारी आहे.  तर 47.52 टक्के ग्रामस्थांनी नाही असे उत्तर दिले.

7) असल्यास व्यवसायाचे स्वरूप

| अ.क्र. | स्वरूप | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | चहा/ अल्पोपहार | ५४ | 26.73% |
| 2 | हॉटेल | २८ | 13.86% |
| 3 | मोटेल | 9 | 4.45% |
| 4 | निवास व न्याहरी | 47 | 23.27% |
| 5 | फक्त निवास | 21 | 10.40% |
| 6 | इतर | 43 | 21.28% |

विश्लेषण

पर्यटनाशी संबधित व्यवसाय सुरु करण्याची तयारी असल्यास व्यवसायाचे स्वरूप कोणते असेल असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर 26.73 ग्रामस्थ चहा/ अल्पोपहार हा व्यवसाय निवडताना दिसतात तर 23.27 टक्के ग्रामस्थ निवास व न्याहरीसाठी तयार आहेत 13.86 टक्के ग्रामस्थ हॉटेल या व्यवसायाची निवड करतात. इतर व्यवसायाची तयारी 21.28 टक्के ग्रामस्थानी दाखविली. 10.40 टक्के ग्रामस्थ फक्त निवास.आणि मोटेल चा व्यवसाय 4.45 टक्के ग्रामस्थ करण्यास तयार आहेत.

8) पर्यटनाशी संबधित व्यवसायाची जाहिरात करायची तयारी

| अ.क्र. | तयारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ७० | 34.65% |
| 2 | नाही | १३२ | 65.34% |

विश्लेषण

पर्यटनाशी संबधित व्यवसायाची जाहिरात करायची तयारी काय असा प्रश्न विचारल्यानंतर 65.34 % ग्रामस्थांनी 'नाही ' असे उत्तर दिले. तर 34.65 टक्के ग्रामस्थांनी 'होय' असे उत्तर दिले.

9) असल्यास... जाहिरातीचे माध्यम

| अ.क्र. | माध्यम | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | डिजिटल बोर्ड | २७ | 13.36% |
| 2 | टिवीवर | १७ | 8.41% |
| 3 | इंटरनेटवर | 20 | 9.90% |
| 4 | सोशल मिडीया | 5 | 2.47% |
| 5 | इतर | 81 | 40.09% |
| 6 | no response | 52 | 25.74% |

विश्लेषण

पर्यटनाशी संबधित व्यवसायाची जाहिरात करण्यास तयार असल्यास जाहिरातीचे माध्यम कोणते निवडाल प्रश्न विचारण्यात आल्यानंतर 40.09% ग्रामस्थ इतर पर्यायाचा विचार करतात. तर 25.74% ग्रामस्थांना जाहिरातीसाठी पर्याय सुचत नाही, तर डिजिटल बोर्ड लावण्यास 13

टक्के ग्रामस्थ तयार आहेत पण , टिवी इंटरनेट, इत्यादींवर जाहिरात करण्याची मानसिकता तितकीशी नाही असे दिसून आले.

10) व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे काय

| अ.क्र. | | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ३२ | 15.84% |
| 2 | नाही | १६४ | 81.18% |
| | no response | 4 | 2.98% |

विश्लेषण

व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे काय असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर 81.18%ग्रामस्थ नाही असे म्हणतात तर केवळ 15.84% ग्रामस्थांनी कर्ज घेतले आहे. आणि 2.98% ग्रामस्थांचा प्रतिसाद नव्हता.

11) असल्यास... कोणत्या बँकेतून

| अ.क्र. | बँक | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | राष्ट्रीय बँक | ११ | 5.44% |
| 2 | खाजगी बँक | १२ | 5.94% |
| 3 | सहकारी बँक/पतसंस्था | 8 | 3.96% |
| 4 | इतर | 171 | 84.65% |

विश्लेषण

व्यवसायासाठी कर्ज घेतले आहे काय असा आणि असल्यास... कोणत्या बँकेतून असा प्रश्न विचारण्यात आल्यानंतर 84.65% ग्रामस्थ इतर मार्गांकडे कर्जासाठी जातात आणि उर्वरित ग्रामस्थ म्हणजे 5.44% ग्रामस्थ राष्ट्रीय बँकांकडे 5.94 ग्रामस्थ खाजगी बँकांकडे आणि 3.96% ग्रामस्थ सहकारी बँक/पतसंस्था यांच्याकडे जातात.

12) व्यवसायासाठी कर्ज घेण्याची तयारी

| अ.क्र. | तयारी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ९३ | 49% |
| 2 | नाही | १०३ | 51% |

विश्लेषण

व्यवसायासाठी कर्ज घेण्याची तयारी 49% ग्रामस्थांनी दाखविली तर 51% ग्रामस्थ नाही म्हणाले.

13) स्वतःच्या मालकीची शेत जमीन

| अ.क्र. | शेत जमीन | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ११५ | 56.93 |

| | | | |
|---|---|---|---|
| 2 | नाही | ८७ | 43.07 |

विश्लेषण

प्रश्नावलीच्या माधमातून आलेल्या माहितीनुसार 56.93 ग्रामस्थांकडे स्वतःची शेत जमीन आहे. तर 43.07 ग्रामस्थांकडे स्वतःच्या मालकीची शेत जमीन नाही.

14) असल्यास प्रकार

| अ.क्र. | प्रकार | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | फळबाग | 74 | 36.63% |
| 2 | पारंपारिक | 31 | 15.35% |
| 3 | मत्स्य शेती | 10 | 4.95% |
| | | 16 | 7.92% |

विश्लेषण

प्रश्नावलीच्या माधमातून आलेल्या माहितीनुसार 36.63% ग्रामस्थांकडे स्वतःची फळबाग आहे. पारंपारिक भात शेत 15.35% ग्रामस्थ करतात तर 4.95% ग्रामस्थ मत्स्य शेती करतात आणि इतर व्यवसाय करणारे ग्रामस्थ 7.92% इतके आहेत.

15) पशुधन आहे

| अ.क्र. | पशुधन | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ६० | 29.70% |
| 2 | नाही | १४२ | 70.30% |

विश्लेषण

प्रश्नावलीच्या माधमातून आलेल्या माहितीनुसार 29.70% ग्रामस्थांकडे पशुधन आहे. तर 70.30% ग्रामस्थांकडे पशुधन नाही.

16) असल्यास - कोणते ?

| अ.क्र. | पशूचे नांव | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | म्हैस | ३५ | 11.11% |
| 2 | बैल | २१ | 6.67% |
| 3 | शेळी/मेंढी | 7 | 2.22% |
| 4 | कुत्रा | 29 | 9.20% |

| | | | |
|---|---|---|---|
| 5 | मांजर | 135 | 42.86% |
| 6 | कोंबडी | 60 | 19.04% |
| 7 | कोंबडा | 26 | 8.25% |
| 8 | इम्मू/बदक | 0 | 0% |
| 9 | गाय | 2 | 0.64% |

विश्लेषण

पशुधन याचा विचार करता गाय, बैल म्हैस, शेळी/मेंढी इत्यादींचा विचार केला जातो. त्यनुसार या गावात गाय, बैल म्हैस, इत्यादींची संख्या मर्यादित आहे.

17) कचरा व्यवस्थापन करता

| अ.क्र. | वर्गीकरण | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | 97 | 48.01% |
| 2 | नाही | 91 | 45.04% |

विश्लेषण

कचरा व्यवस्थापनात कचरा वर्गीकरणाची सुविधा मर्यादित स्वरुपाची आहे.

18) कचरा व्यवस्थापन सैद्रिय खत निर्मिती

| अ.क्र. | सै. खत निर्मिती | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ४८ | 23.76% |
| 2 | नाही | १५३ | 75.74% |
| 3 | no response | 1 | 0.49% |

विश्लेषण

कचऱ्यापासून सेंद्रिय खात निर्मिती केली जाते पण कमी प्रमाणात.

19) कचरा व्यवस्थापन - कचरा जाळला जातो?

| अ.क्र. | जाळला जातो | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | १७२ | 85.14% |
| 2 | नाही | २६ | 12.87% |
| 3 | no respoince | 4 | 1.98% |

विश्लेषण

कचरा येथे खूप प्रमाणात जाळला जातो. इथे जनजागृतीची गरज आहे.

20) कचरा व्यवस्थापन -जमिनीत पुरला जातो

| अ.क्र. | ज. पुरला जातो | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ७२ | 35.64% |
| 2 | नाही | ११६ | 57.43% |
|  | no response | 14 | 6.93% |

विश्लेषण

काही ग्रामस्त कचरा जमिनीत पुरतात ही गोष्ट आशादायी आहे.

21) कचरा व्यवस्थापन- टाकावू पासून टिकाऊ निर्मिती करता

| अ.क्र. | निर्मिती | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ३५ | 17.33% |
| 2 | नाही | १४८ | 73.27% |
| 3 | no response | 19 | 9.4 |

विश्लेषण

काही ग्रामस्त टाकाऊ पासून टिकाऊ निर्मिती करतात ही गोष्ट आशादायी आहे.

22) सांडपाणी व्यवस्थापन-उघड्यावर सोडता

| अ.क्र. | उघड्यावर | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ३४ | 16.83% |
| 2 | नाही | १५५ | 76.73% |
| 3 | no | 13 | 6.43% |

| | response | | |
|---|---|---|---|

.

विश्लेषण

76.73% ग्रामस्थ सांडपाणी उघड्यावर सोडीत नाहीत. तर केवळ 16.83% ग्रामस्थ सांडपाणी उघड्यावर सोडतात.

23) सांडपाणी व्यवस्थापन- जमिनीत जिरविता

| अ.क्र. | जमिनीत जिरविता | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | १६७ | 82.67% |
| 2 | नाही | २५ | 12.38% |
| 3 | no response | 10 | 4.95% |

विश्लेषण

येथील ग्रामस्थ सांडपाणी जमिनीत जीर्वितात ही गोष्ट चांगली आहे.

24) सांडपाणी व्यवस्थापन - पुनर्वापर केला जातो

| अ.क्र. | पुनर्वापर | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | ४९ | 24.26% |
| 2 | नाही | १३३ | 65.84% |
| 3 | no response | 20 | 9.90% |

विश्लेषण

येथील काही ग्रामस्थ सांडपाण्याचा पुनर्वापर करताना आढळतात.

25) सांडपाणी व्यवस्थापन -बागेसाठी उपयोग

| अ.क्र. | बागेसाठी उपयोग | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | होय | १४० | 69.30% |
| 2 | नाही | ५३ | 26.24% |
| 3 | no response | 9 | 4.46% |

विश्लेषण

सांडपाण्याचा वापर बागेसाठी केला जातो.

26) उर्जा स्रोत-अन्न शिजविण्यासाठी

| अ.क्र. | अन्न शिजविण्यासाठी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | शेणी किंवा गोवर | १५ | 7.42% |
| 2 | गेंस | १४३ | 70.79% |
| 3 | बायोगॅस | 3 | 1.48% |
| 4 | सौर उर्जा | 0 | 0% |
| 5 | इतर | 0 | 0% |
| 6 | लाकूड | 111 | 0.00% |

विश्लेषण

70.79% ग्रामस्थ अन्न शिजविण्यासाठी गेंसचा वापर करतात. पण बायोगॅस वापरणारेही मीठमुंबरीत आहे ही गोष्ट चांगली आहे.

27) प्रकाशासाठी

| अ.क्र. | प्रकाशासाठी | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | पारंपारिक वीज | १९८ | 98.01% |
| 2 | सौर-उर्जा | १ | 0.49% |
| 3 | बायोगॅस | 2 | 0.99% |
| 4 | घासलेट | 6 | 2.97% |
| 5 | इतर | | |

विश्लेषण

सर्वसाधारणपणे प्रकाशासाठी पारंपारिक विजेचा वापर केला जातो. पण सौर उर्जा वापरणारे एक कुटुंब इथे आहे.  तसेच बायोगॅस वापरणारी दोन कुटुंबे येथे आहेत ही प्रगतीची लक्षणे आहेत.

28) पाण्याचा स्रोत

| अ.क्र. | पाण्याचा स्रोत | एकूण | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | विहीर | ९१ | 45.05% |
| 2 | बोअर | १२ | 5.94% |
| 3 | पाझर तलाव | 0 | 0% |
| 4 | नळ योजना | 121 | 59.9 |

विश्लेषण

सर्वसाधारणपणे या गावी विहीर हा पाण्याचा मुख्य स्रोत आहे. पण या गावात बोअर सुदधा लक्षणीय आहेत. नळ योजनेचे पाणी काही भागात आहे.

29) पारसबागेतील वनस्पती

| अ.क्र. | वनस्पती | एकूण |
|---|---|---|
| 1 | माड | १०२७ |
| 2 | पोफळी | १०१ |
| 3 | आंबा | 2658 |
| 4 | काजू | 162 |
| 5 | चिक्कू | ४७ |
| 6 | शिताफळ | 9 |
| 7 | पपई | 37 |
| 8 | केळी | 255 |
| 9 | मसाला वेल किंवा वनस्पती | 8 |
| १० | फुलझाड | 37 |
| 11 | रामफळ | १ |
| १२ | पेरू | ४६ |

| अ.क्र. | वनस्पती | एकूण |
|---|---|---|
| १३ | फणस | ५ |
| 14 | आवळा | १ |
| 15 | जांभूळ | 3 |
| 16 | अशोकवृक्ष | १ |
| १७ | बेलवृक्ष | 1 |
| 18 | कडीपत्ता | ४ |

विश्लेषण

परसबागेतील वनस्पती पाहिल्यास येथे जेव विविधता आढळते.

## निष्कर्ष

1) बहुतांशी ग्रामस्थांचे वास्तव्य या गावी कायमस्वरूपी आहे असे दिसते. पण पर्यटन व्यवसायासाठी घरातील काही खोल्या किंवा भाग भाड्याने देण्याची मानसिकता येथे आढळत नाही.
2) ग्रामस्थांची पर्यटनाशी सबंधित व्यवसाय करण्याची तयारी आहे. चहा/नास्त्याची टपरी घालू इच्छिणाऱ्याचे प्रमाण नजरेत भरण्यासारखे आहे. निवास व न्याहरीची व्यवस्था करू पाहणाऱ्याची संख्या पण चांगली आहे.
3) पर्यटनाशी संबधित व्यवसायाची जाहिरात करायची मानसिकता इथे कमी आढळते.
4) व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्यांची संख्या कमी आहे. आणि राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेणाऱ्यांचे प्रमाण अगदी नगण्य आहे.
5) व्यवसायासाठी कर्ज घेण्याची तयारी तितकीशी वाटत नाही.
6) स्वतःच्या मालकीची जमीन ५६ % ग्रामस्थांकडे आहे. पण जवळपास तेवढीच संख्या भूमिहीनाची आहे.
7) शेतीच्या प्रकारांपैकी स्वतःची फळबाग असणारे ग्रामस्थ ३६ टक्के आहेत तर 15 टक्के ग्रामस्थ पारंपारिक भातशेती करणारे आहेत.
8) शेतीला पूरक व्यवसाय किंवा जोडधंदा करण्याबाबत ग्रामस्थांमध्ये अनास्था दिसून येते.

## उपाय योजना

1) मिठ्मुंबरी येथे पर्यटन विकास होण्यासाठी ग्रामस्थांनी आपली मानसिकता बदलणे आवश्यक आहे. अधिकाधिक लोकांनी पर्यटन पूरक व्यवसाय करण्यास तयार होणे हे गावच्या समृद्धीसाठी आवश्यक आहे.
2) ग्रामस्थांची पर्यटनासम्ब्धीत व्यवसाय करण्याची तयारी आहे. चहाची टपरी जरी घातली तरी योग्य ते प्रशिक्षण घेतल्यास हा व्यवसायही चांगल्या प्रकारे करता येतो.
3) पर्यटकांसाठी जेवण व निवास या सुविधेव्यतिरिक्त इतर सेवा देण्यासंबधी मार्गदर्शनाची आवश्यकता आहे.
4) पर्यटन स्थळांची जाहिरात करण्यासंदर्भात नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून देण्याची आवश्यकता आहे.
5) व्यवसायासाठी कर्ज घेतलेल्यांची संख्या कमी आहे. राष्ट्रीयकृत बँकाकडून कर्ज घेण्यासंदर्भात प्रबोधन व मार्गदर्शनाची गरज आहे.
6) स्वतःच्या मालकीची जमीन असणाऱ्यांपैकी आंबा बागायतदार यांची संख्या लक्षणीय आहे. पर्यटकांना मोहिनी घालणारा 'देवगड हापूस' साठी एक प्रकारची बाजारपेठ आहे. त्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.
7) शेतीला पूरक व्यवसाय किंवा जोडधंदा करण्याबाबत ग्रामस्थांमध्ये अनास्था दिसून येते. इथे प्रबोधन व मार्गदर्शन आवश्यक आहे.
8) पशुधन वाढविण्यासाठी जनजागृती होणे आवश्यक आहे.

मीठमुंबरी गावचे सर्वेक्षण केल्यानंतर असे जाणवते की निसर्गाने भरभरून श्रीमंती दिलेला हा परिसर सर्व अर्थाने समृद्ध व्हायचा असेल तर येथील प्रत्येकाने आपली मानसिकता सकारात्मक ठेवली पाहिजेत. येऊ घातलेल्या पर्यटन संधीचा लाभ घेण्यासाठी हे आवश्यक आहे. ग्रामस्थ सकारात्मक मानसिकतेने या पर्यटन संधीचा लाभ घेतील ही अपेक्षा.

******

APPENDIX

- QUESTIONNAIRE PREPARED FOR SURVEY WORK

शाश्वत पर्यटनाच्या दृष्टीकोनातून ग्राम सर्वेक्षण

वाडीचे नाव/ गावाचे नाव :______________________

तालुका : ___________________________जिल्हा: ____________

सर्वेक्षकाचे नाव:____________________वर्ग :_________________

## भाग : अ

1. कुटुंब प्रमुखाचे नाव : __________________________________
2. वय : _______________ 3. शिक्षण % ___________________
4. छंद :___________________
5. व्यवसाय : ____________________
6. कुटुंबाचा तपशील:

| अ.क्र. | सदस्याचे नांव | नाते | शिक्षण | छंद | व्यवसाय | उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

(योग्य पर्यायाच्या चौकोनात √ अशी खुण करावी)

7. घराचा प्रकार I. कच्चे बांधकाम ☐ II. पक्के ☐

8. घराचे स्वरूप : I. एक मजली ☐ II. दोन मजली ☐

III.तीन मजली ☐ IV. चार मजली ☐

9. घरातील साहित्याचा तपशील :

| अ.क्र. | फर्निचर | | | सुविधा | | | वाहन | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | प्रकार | | संख्या | प्रकार | संख्या | प्रकार |
| 1 | पलंग | | | साधा बल्ब | | | | |
| 2 | टेबल | | | ट्यूब | | | | |
| 3 | खुर्ची | | | लेड | | | | |
| 4 | शोकेस | | | शीएफल | | | | |
| 5 | ड्रेसिंग टेबल | | | पंखे | | | | |
| 6 | डायनिंग टेबल | | | टीवी | | | | |
| 7 | टिपोय | | | फ्रीज | | | | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | सोफा | | | ए.सी. | | | | |
| 9 | कपाट | | | ओवन | | | | |
| 10 | | | | संगणक | | | | |
| 11 | | | | इंटरनेट | | | | |
| 12 | | | | फोन | | | | |
| 13 | | | | मोबाईल | | | | |

10. वास्तव्याचे स्वरूप

I. कायम स्वरूपी: ☐ II. अल्प कालावधीसाठी: ☐

III. समारंभासाठी : ☐ IV. सण/ उत्सव : ☐

iv इतर______________________________________________________

भाग – ब

11. कायमस्वरूपी वास्तव्यास नसल्यास आपले घर व्यावसायिक कारणासाठी भाडे तत्वावर देण्याची तयारी आहे का ? होय: ☐ नाही: ☐

12. कायम स्वरूपी वास्तव्य असल्यास आपल्या घराचा भाग /खोल्या पर्यटनासाठी/व्यवसायीक कारणासाठी वापरण्याची तयारी आहे : होय: ☐ : नाही ☐

13. पर्यटनाशी संबधित व्यावसाय सुरु करण्याची तयारी आहे का ?

होय: ☐ नाही: ☐

14. असल्यास व्यवसायाचे स्वरूप :

i. चहा/अल्पोपहार ☐ ॅटेल: ☐ iii. मौटेल ☐

iv. निवास व न्याहारी : ☐ v. फक्त निवास: ☐

इतर :______________________________________________

15. आपण जर पर्यटन व्यवसायासाठी आपले घर वापरीत असाल तर अशा घराची जाहिरात करण्यास आपण तयार आहात का? होय: ☐ नाही: ☐

16. असल्यास जाहिरातीसाठीचे माध्यम : i. डिजिटल बोर्ड : ☐ ii. र ☐

III. इंटरनेटवर : ☐ iv. सोशल मिडीया ☐

इतर:______________________________________________

17(A). व्यवसायासाठी कर्ज घेतले: होय : ☐ म: ) नाही: ☐

17(B) i राष्ट्रीय बँक % ☐ ii [kktxh cWad % ☐

iii सहकारी बँक/पतसंस्था % ☐

iv इतर %________________________________ __________________

18. व्यवसायासाठी कर्ज घेण्याची तयारी आहे: होय : ☐ : ☐

19. स्वतःच्या मालकीची शेत जमीन होय (क्षे ☐ ) नाही : ☐

i. बाग/फळ बाग : ☐ पारंपारिक : ☐ iii. मत्स्य शेती : ☐

इतर:___________________________________________________

20(A). पशुधन आहे : नाही ☐ ☐

20(B.: असल्यास :

| अ.क्र. | पशूचे नांव | प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1 | म्हैस | | |
| 2 | बैल | | |
| 3. | शेळी/मेंढी | | |
| 4 | कुत्रा | | |
| 5 | मांजर | | |
| 6 | कोंबडी | | |
| 7 | कोंबडा | | |
| 8 | इम्मू/बदक | | |

इतर___________________________________________________

21. कचरा व्यवस्थापन :

21.1 कचऱ्याचे वर्गीकरण करता: होय : नाही : ☐ ☐

21.2 कचऱ्यापासून सैद्रिय खत निर्मिती : होय : नाही : ☐ ☐

21.3 कचरा जाळला जातो : होय : ☐ नाही : ☐

21.4 कचरा जमिनीत पुरला जातो होय : नाही : ☐ ☐

21.5 टाकावू पासून टिकाऊ निर्मिती करता होय : नाही : ☐ ☐

22. सांडपाणी व्यवस्थापन :

22.1 सांडपाणी उघड्यावर सोडता : होय : ☐ नाही : ☐

22.2 सांडपाणी जमिनीत जिरविता होय : ☐ नाही : ☐

22.3 सांडपाण्याचा पुनर्वापर केला जातो होय : ☐ नाही : ☐

22.4 सांडपाण्याचा उपयोग बागेसाठी करता होय : ☐ नाही : ☐

22.5 इतर कारणासाठी ________________________________________

23. उर्जा स्रोत:

23.1 अन्न शिजविण्यासाठी : i. लाकूड : ☐ ii. ी किंवा गोवर : ☐

iii. गॅस : ☐ योगॅस : ☐

v. सौर उर्जा : ☐

vi. इतर________________________________________

23.2 प्रकाशासाठी : i. पारंपारिक वीज : ☐ ii. र्जा: ☐

iii. बायोगॅस : ☐ सलेट : ☐

v. इतर:____________________________________________

24. पाण्याचा स्रोत : i. विहीर : ☐ ii. बोअर : ☐

iii. पाझर तलाव : ☐ iv. नळ योजना : ☐

25. स्वच्छतेसाठी वापरण्यात येणारे साहित्य : i. विविध रसायने : ☐

ii. पारंपारिक साधने : ☐

26. पारसबागेतील वनस्पती :

| अ. क्र. | वनस्पती | संख्या | प्रकार |
|---|---|---|---|

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | माड | | |
| 2 | पोफळी | | |
| 3 | आंबा | | |
| 4 | काजू | | |
| 5 | चिक्कू | | |
| 6 | शिताफळ | | |
| 7 | पेरू | | |
| 8 | पपई | | |
| 9 | केळी | | |
| 10 | मसाला वेल किंवा वनस्पती | | |
| 11 | | | |
| 12 | | | |
| 13 | | | |
| 14 | | | |
| 15 | | | |
| 16 | | | |
| 17 | | | |

सही

(                    )

दिनांक :   /   / 20